सं.फौ. खटला क्र. ३६२/२०२२
शासन वि. सोपान
निशाणी क्र. २२/ क

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ यांचे शपथेवर जबानी.**

माझे नाव ः–सचिन रमेश लोखंडे

वय ः– ३२ वर्षे धंदाः– व्यवसाय

राहणारः– घाटा पिंपरी ता. आष्टी जि बीड

**अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. गव्हाळे यांचेतर्फे साक्षीदाराचा सरतपास न्यायालयामार्फत शपथेवर सुरु ः–**

१. माझ्या चुलत भावाचे नाव राजु तुकाराम लोखंडे आहे. दि. १०/०२/२०२२ रोजी सकाळी ६.०० वाजण्याच्या सुमारास मी सकाळी व्यायाम करण्यासाठी नगर–बीडने रोडने चाललो असता, शिवमावळा हॉटेल गवळवाडा जवळ एक इसम पडलेला दिसला. मी पाहिले असता, तो माझा चुलत भाऊ राजु लोखंडे होता. तो एका अंगावर पडलेला होता. त्याला उठवण्याचा प्रयत्न केला असता तो उठला नाही. त्याच्या नाका तोंडातुन, व कानातुन रक्त येत होते. गावातील भागचंद झांजे, अंकुश तळेकर यांना फोनवर कळवले. ते घटनास्थळी आले. त्यांना उठवण्याचा प्रयत्न केला. परंतु ते उठले नाही. त्यांचे शरीर थंड पडले होते. तो मयत झाल्याचे लक्षात आल्याने आम्ही रुग्णवाहिका बोलावली. घटनास्थळावरुन ५–१० मीटर अंतरावर लोखंडी गुलाबी हिरव्या रंगाचा बंपर तुटुन पडलेला होता त्यावर मराठीत दोस्तांना नाव लिहलेले होते. मयतास रुग्णवाहिकेमध्ये सुलेमान देवळा येथे सरकारी दवाखान्यात नेले. डॉक्टरांनी तपासुन त्यास मयत घोषित केले. पोलीसांना घटनेबाबत माहिती दिली.

२. पोलीसांनी दवाखान्यात मयताचा पंचनामा केला. त्यानंतर मयताचे पी.एम. केले व प्रेत ताब्यात दिले. दुसऱ्या दिवशी अंभोरा पोलीस स्टेशन येथे अज्ञात इसमाविरुध्द व वाहनाविरुध्द फिर्याद दिली. साक्षीदारास फिर्याद दाखवण्यात आली. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. फिर्यादीस **नि. पी. २३/पी.डब्ल्यु ३** देण्यात

येते. त्यानंतर मी घटनेबाबत वॉटसॅप फ्रेण्डस ग्रुपवर बंपरचा फोटो टाकुन माहिती दिली व गाडी कोणाची असलेबाबत माहिती कळवण्याची विनंती केली. मला अंकुश तळेकर याने सदर बंपर नागतळा येथील गाडीचे असल्याचे सांगितले. माहिती मिळाल्यानंतर मी पोलीस स्टेशनला गेलो व गाडीबाबत सांगितले. नागतळा येथे जाऊन चौकशी केल्यानंतर आरोपी सोपान सानप याची पांढऱ्या रंगाचा पिकअप असल्याचे कळाले. आरोपीच्या घरासमोर गाडी पाहिली. त्या पिकअप क्र. एम.एच. ४२ ए.क्यु. २८०७ होता व त्यावर मराठीत दोस्ती लिहलेले होते. गाडी व बंपर चा फोटो पाहिल्यास ओळखु शकतो. अभिलेखावरील फोटो साक्षीदारास दाखवण्यात आले. सदर फोटो बंपरचा आहे. सोबत फोटोमध्ये मयताचे प्रेत दिसुन येते. फोटोस ओळखीकामी **आर्टीकल अ** देण्यात येते. पोलीसांनी चौकशी करुन माझा जबाब नोंदवला. आरोपीस पाहिल्यास ओळखु शकतो. **नि.२१** वरील आदेशाप्रमाणे ओळख न नाकारण्याच्या अटीसह हजेरी माफी मंजुर.

**सरतपास पुर्ण**

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री बी.व्ही. दाणी यांचेमार्फत**

३. बीड-कल्याण रस्ता महामार्ग आहे. हे म्हणणे खरे आहे की, धामणगाव येथे पाथर्डी व नगर व बीड , कडा साठी एक चौफुला आहे. सुलेमान देवळा मार्गे कड्याला रस्ता जात असलेबाबत माहिती नाही. मी सकाळी ६.३० वाजता फिरायला गेलो. बरेच लोक सकाळी ५ ते ६ वाजण्याचा सुमारास चालण्यासाठी जातात. अमान्य की, माझ्या पुढे लोक होते. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्याने वाहनाची ये-जा असते. हे म्हणणे खरे आहे की, मयतास कोणी धडक दिली हे प्रत्यक्षात पाहिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मयत पाहिला तेव्हा रस्त्याला पडलेला होता. मी अपघातस्थळी जाण्याअगोदर अर्धा पुर्वी अपघात झाला असावा. हे म्हणणे खरे आहे की, मयताचा विमा मिळण्यासाठी दावा दाखल केला आहे. अमान्य की, नुकसान भरपाई मिळाली. हे म्हणणे खरे आहे की, अंकुश तळेकर यांनी सांगितल्यानंतर पुढील कार्यवाही केली. अमान्य की, विमा मिळण्यासाठी कोणत्यातरी वाहनाने अपघात झाल्याचे दाखवावे लागते म्हणुन सदरची खोटी केस केली. अमान्य की, आरोपीचा घटनेशी संबंध नाही.

४.		अमान्य की, विमा मिळण्यासाठी खोटी केस केली. अमान्य की, वाहनाचा ठावठिकाणाचा मिळुन आला नाही. अमान्य की, मयताचा मृत्यु कसा झाला याबाबत माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, साक्षीदार यादीतील सर्व साक्षीदार गावातील आहेत. अमान्य की, पोलीसांनी जबाब नोंदवला नाही. अमान्य की, बंपर मिळुन आल्याचे खोटे सांगत आहे. अमान्य की, बंपरच्या फोटाचा घटनेशी संबंधीत नाही. अमान्य की, खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

दि.२८.११.२०२५

श्रवणोत्तर स्वीकृती

MAHESH RAMCHANDRA BADAKH

Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2025.11.28 17:32:27 +0530

श्री. एम. आर.बडाख

३रे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग आष्टी